<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.1 चा उलटतपास प्रतिवादीतर्फे अॅड. श्री.एस.एम. लड्डा वकिलांमार्फत शपथेवर सुरू .</u>

१. हे म्हणणे खरे आहे की, ठराव क्र.४ (निशाणी क्र.३४) मध्ये कोठेही तारीख नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेने कोणताही ठराव मंजुर केल्यास सदरचा ठराव डी.डी.आर. यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवावा लागतो. हे मला माहिती नाही की, निशाणी क्र.३४ वर संस्थेचा शिक्का नसल्याने सदरचा ठराव डी.डी.आर. यांनी मान्य केला किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचे प्रकरण श्री.शत्रुघन मुंडे यांनी दाखल केले होते, कारण मी त्यावेळी संस्थेचा अध्यक्ष नव्हतो. साक्षिदार स्वत:हून सांगतो की, त्यावेळी मी संस्थेचा संचालक होतो. प्रस्तुत प्रकरण दाखल करण्याचे संपुर्ण अधिकार संचालक मंडळामार्फत शत्रृघ्न मुंडे यांना देण्यात आल्याबाबतचा उल्लेख ठरावामध्ये नमुद होता. मी अध्यक्ष झालो त्यावेळी मला प्रस्तुत प्रकरण चालविण्याचा अधिकार प्राप्त झाला. शत्रृघ्न मुंडे यांच्याकडून प्रस्तुत प्रकरण चालविण्याचा आधिकार काढला किंवा कसे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, शत्रृघ्न मुंडे यांचा प्रस्तुत प्रकरण चालविण्याचा अधिकार काढून मला दिल्याचे मी खोटे सांगत आहे.

२. हे मी सांगु शकत नाही की, प्रतिवादीकडून वादी संस्थेने सभासद शुल्क किती रूपये स्वीकारले होते. हे म्हणणे खरे आहे की, करारनामा (निशाणी क्र.२०) नुसार प्रतिवादीकडून ठेव म्हणून रू.दोन लाख घेण्यात आले होते. वादी संस्थेने प्रतिवादीस सदरचे वाद दुकान हे कमिशनच्या आधारे दिले होते. वादी संस्थेने वाद दुकान ही कमिशनच्या आधारे देण्याबाबत ठराव मंजुर केला होता.

त्याची प्रत वादी संस्थेकडे आहे ती मी दाखल करू शकतो. हे मला माहिती नाही की, प्रतिवादीच्या स्थावर मालमत्तेवर कमिशन देण्यात आले होते किंवा कसे. कमिशन नेमके किती दराने काढण्यात आले, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद दुकानाचे मुळ मालक महानगरपालिका आहे. हे मला माहिती नाही की, महानगरपालिकेजवळ स्थावर मालमत्ता नेमकी कुठुन आली. हे म्हणणे खरे आहे की, वाद दुकानाच्या बाजुला भाटे मैदान होते व त्या मैदानाची ही संपूर्ण स्थावर मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती संपूर्ण स्थावर मिळकत नगरपालिकेस देण्यात आली होती. हे मला माहिती नाही की, वाद मिळकतीच्या बाजुला असलेल्या मार्केटला नगरपालिकेने भाडे तत्वावर जागा दिली किंवा कसे. हे मला माहिती नाही की, वाद मिळकतीच्या शेजारीच कपडा बाजार इ. स्थित आहेत किंवा कसे. हे मी सांगु शकत नाही की, वादी संस्थेने प्रतिवादीला नेमक्या किती वर्षांकरीता वाद दुकान कमिशनच्या आधारे दिले होते.

३. हे म्हणणे खरे आहे की, कोणत्याही पक्या दुकानात नगरपालिका ही स्वत:ची कर आकारणी करते. सन २०१७ पर्यंत वादी संस्थेने वाद मिळकतीतील दुकानांचा कर नगरपलिकेस भरल्याबाबतच्या पावत्या वादी जवळ आहेत. त्या मी अभिलेखावर दाखल केल्या नाहीत. नगरपालिकेने वाद मिळकत ही वादी संस्थेत एकूण ९९ वर्षांकरीता भाडे तत्वावर दिली होती व ती आजरोजी पर्यंत संपुष्टात आलेली नाही. भाडे करारनाम्याची प्रत वादी संस्थेजवळ नाही. हे मला माहिती नाही की, नगरपालिकेतील भाडे पट्टी तयार करतांना संस्थेला काही अटी व शर्ती लादुन दिल्या होत्या किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, नगर पालिकेने वादी संस्थेचे दुकाने सिल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, कपडा, किराणा, होलसेल

व रिटेल दुकानांचा माल दुकानांमध्ये असतांना नगर पालिकेने एकूण ५३ दिवसांकरीता सदरची दुकाने सिल केले होते. हे मला माहिती नाही की, त्यामुळे दुकानदारांनी वादी संस्थेवर व नगरपालिकेवर दुकान चालू करण्याबाबत मोर्चा नेला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, ज्यांनी दुकाने सिल केले त्यांनाच ते उघडण्याचे अधिकार असतात. सदरचे सिल केलेले दुकाने नगरपालिकेने उघडले होते. हे मला माहिती नाही की, सदरच्या दुकानांचे सिल काढतांना नगरपालिकेने दुकानदारांना रू.एक लाख नगरपालिकेत डिपॉझीट करून, वर्षाचे भाडे डिपॉसीट करून व त्यावर वार्षिक कर भरण्याबाबच्या अटी व शर्तीवर उघडून दिले होते. हे मला माहिती नाही की, सदरच्या अटींची पुर्तता करून आजरोजी पर्यंत वाद दुकाने हे दुकानदार चालवित आहेत किंवा कसे.

४. प्रतिवादीने भाड्याच्या रकमेबाबत वादी संस्थेला पावत्या दिल्या होत्या. त्या पावत्या संस्थेजवळ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सन–२०१७ ते २०२६ पर्यंत वादी संस्थेला वाद दुकानांचा कर नगरपलिकेने न भरल्याने मी त्याबाबतच्या पावत्या अभिलेखावर दाखल केल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वादी संस्थेने सन–२०१७ मध्ये नगरपालिकेविरूध्द दिवाणी न्यायालय, अकोला येथे मनाई हुकूमाचा दावा केला होता. हे मला माहित नाही की, सदरचा दावा खारीज होवून त्यावर मा.जिल्हा न्यायालयात अपिल झाली होती व ती अपिल देखील खारीज होवून मा.उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे रिट होवून ती देखील खारीज झाली होती किंवा कसे. हे मला माहिती नाही की, दुकानदारांकडून कोण भाडे व कर घेत आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व भाडेकरू हे वादी संस्थेच्या कार्यालयाला लागून आहेत. हे म्हणणे खरे नाही की,

दुकानदारांजवळून कायद्याप्रमाणे संपूर्ण दस्त उपलब्ध असल्याने वादी संस्थेने आजपावेतो त्यांच्या दुकानदारीविरूध्द आक्षेप घेतला नाही. हे म्हणणे खरे आहे की, करारनामा (निशाणी क्र.२०) मधील अटी व शर्तीचे उल्लंघन प्रतिवादीने केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सर्व दुकानदार आपआपला व्यापार सुरळीतरीत्या करीत आहेत.

(प्रतिवादीच्या विद्वान वकीलांनी बॅंकेतील काही दस्तऐवज दाखल करण्यासाठी वेळ मागितल्यावरून प्रतिवादीस शेवटची संधी म्हणून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येतो.)

समक्ष

दिनांक: ०९.०३.२०२६
ठिकाण: अकोला

(व्ही. व्ही. जोशी)
न्यायाधीश
सहकार न्यायालय, अकोला.